# श्री. ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालयात रॅगिंग प्रबंधात्मक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन

संगमनेर : श्री. ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत रॅगिंग प्रबंधात्मक जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी संगमनेर न्यायालयाचे तदर्थ जिल्हा न्यायाधीश 1 व अतिरिक्त सत्र न्यायाधीश मा. श्री. एम. एम. शेख तसेच सहदिवाणी न्यायाधीश श्रीमती के. के. पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. राहूल देशमुख, संगमनेर वकील संघाच्या उपाध्यक्षा ॲड. स्मिता सस्कर उपस्थित होते.

रॅगिंग प्रबंधात्मक जनजागृती कार्यक्रमाप्रसंगी संगमनेर न्यायालयाचे तदर्थ जिल्हा न्यायाधीश 1 व अतिरिक्त सत्र न्यायाधीश मा. श्री. एम. एम. शेख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाराष्ट्र रॅगिंग करण्यास मनाई करणे अधिनियम 1999 तसेच विद्यापीठ अनुदान आयोग अंतर्गत असलेल्या विविध तरतुदींची माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना ॲन्टी रॅगिंग या कायद्याविषयी देशातील 40 टक्के मुले रॅगिंगचे शिकार होतात, त्यापैकी फक्त 1.5 टक्के मुलेच त्याची तक्रार करतात असे सांगितले. विद्यार्थ्यांनी रॅगिंग पासून दुर रहावे, व रॅगिंग झाल्यास तत्काळ महाविद्यालयात तक्रार करावी असे आवाहन केले.

तसेच दुसऱ्या प्रमुख अतिथी संगमनेर न्यायालयाच्या सहदिवाणी न्यायाधीश श्रीमती के. के. पाटील यांनी जागतिक युवा दिन व न्यायिक क्षेत्रातील करिअर विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. राहूल देशमुख यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात रॅगिंग प्रबंधात्मक जनजागृती कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. स्वागत, सत्कार व अतिथी परिचर धनश्री काळे हिने केला. सूत्रसंचालन किर्ती गायकर हिने केले. आभार प्रा. अक्षय पादीर यांनी मानले. कार्यक्रमास कार्यालयीन अधिक्षक सचिन वालझाडे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर सहकारी व विद्यार्थी उपस्थित होते.


EAST
तालुका विधी सेवा समिती, संगमनेर
व वकील संघ, संगमनेर
यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित
कायदे विषयक जन जागृती
शिबीर
शिक्षण प्रसारक संस्थेचे


तालुका विधी सेवा समिती, संगमनेर
व वकील संघ, संगमनेर
यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित
कायदे विषयक जन जागृती
शिबीर
शिक्षण प्रसारक संस्थेचे
श्री. ओंकारनाथ मालपाणी
विधी महाविद्यालय, संगमनेर



EAST
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व
शिक्षण प्रसारक संस्थेचे
श्री. ओंकारनाथ मालपाणी
विधी महाविद्यालय, संगमनेर
S.P. Sanstha's
Shri. Omkarnath Malpani
Law College,
Sangamner




EAST
तालुका विधी सेवा समिती, संगमनेर
व वकील संघ, संगमनेर
यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित
कायदे विषयक जन जागृती
शिबीर
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व
शिक्षण प्रसारक संस्थेचे
श्री. ओंकारनाथ मालपाणी
विधी महाविद्यालय, संगमनेर
S.P. Sanstha's
Law College,
Sangamner